# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय**

**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**

**फोन नं. ०२२-२९४५१००१**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक :- १७५-२२** **दिनांक :- ०९/०६/२०२२**

## अल्पवयीन मुलीचे कौमार्यभंग करण्याच्या बोलीवर सौदा ठरवुन मोठी रक्कम स्विकारतांना छापा कारवाई करुन पिडित मुलींची सुटका करण्यात अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष- भाईंदर पथकास यश.

दिनांक ०८.०६.२०२२ रोजी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष- भाईंदर यांना बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, महिला वेश्यादलाल निकीता (बदलेले नांव) व तीचा साथीदार सोनु रा. दहिसर हे वेश्यागमनाच्या मोबदल्यात गिऱ्हाईकांना मुली पुरवित असुन कौमार्यभंग करण्यासाठी अल्पवयीन मुलीला घेवुन २,००,०००/- रुपयात सौदा करण्यासाठी दारास ढाबा, मुंबई अहमदाबाद महामार्ग, काशिमीरा येथे येणार आहेत.

मिळालेल्या बातमीच्या कायदेशीर बाबींची पुर्तता करुन पोनि. हंडोरे यांनी बोगस गिऱ्हाईक व पंच यांना दारास ढाबा, मुंबई-अहमदाबाद महामार्ग, काशिमीरा येथे पाठवुन सत्यता पडताळुन पोलीस पथकासह दिनांक ८/६/२०२२ रोजी १८.१५ वा. छापा टाकला असता महिला वेश्यादलाल १) निकीता (बदलेले नांव) वय-२१ वर्ष, तिची मावशी २) पायल (बदलेले नांव), वय-४५ वर्ष, व पाहिजे आरोपी ३) सोनु रा. दहिसर यांनी आपसात सगंमत करुन १५ व १७ वर्षाच्या अल्पवयीन मुलींचे कौमार्यभंग करण्याच्या बोलीवर २,००,०००/- रुपये रक्कम ठरवुन बोगस पुरुष गिऱ्हाईकाकडुन रक्कम स्विकारल्याने त्यांना ताब्यात घेवुन ०२ अल्पवयीन मुली आणि ०१ पिडित मुलगी अशा एकुण ०३ मुलींची सुटका करण्यात आली आहे. सदर बाबत तेजश्री शिंदे, महिला सहा.पोलीस निरीक्षक यांनी सरकारतर्फे दिलेल्या फिर्यादीवरुन वरील आरोपीतांविरुध्द काशिमिरा पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि.नं. I ३७८/२०२१ भा.दं.वि.सं.कलम ३६६ (अ), ३७०(१)(४), ३७२, ३४ अ.व्या.प्रति.अधि. १९५६ चे कलम ४, ५ सह बालकाचे लैगिंक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम १७, १८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई डॉ. श्री महेश पाटील, पोलीस उप.आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त, (गुन्हे) मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि. श्री देविदास हंडोरे, सपोनि तेजश्री शिंदे- भरोसा सेल, सपोउपनि उमेश पाटील, विजय निलंगे, रामचंद्र पाटील, पोशि/केशव शिंदे, व चा.पोना/०६१०६ गावडे नेम- अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर तसेच पोहवा/धनाजी इंगळे, पोहवा/घरबुडे नेम- अंमली पदार्थ विरोधी कक्ष व मपोना/ कवळे यांनी केली आहे.